**नियमीत दिवाणी मुकदमा नं. ४१/२०१७ मधील निशाण ४२ वरील आदेश**

CNR: MHSI05-000181-2017

प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी क्र. ३, ६ व ७ यांचे मार्फत दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जान्वये त्यांनी असे नमूद केले आहे की त्यांचेविरुध्द दिनांक ९/१०/२०१७ रोजी एकतर्फा आदेश झाला आहे. त्यांचे अज्ञानपणामुळे कैफियत देण्याची राहून गेली. प्रस्तुत दाव्यात कैफियत न दिल्यास त्यांचे नुकसान होणारे आहे. सबब, त्यांचे विरुध्द झालेला 'एकतर्फा आदेश' रद्दबातल करावा अशी मागणी त्यांनी केली आहे.

२. या अर्जास वादीतर्फे अर्जावरच म्हणणे सादर करण्यात आलेले असून त्यांनी एकतर्फा आदेश झाल्याच्या सुमारे दोन वर्षाच्या कालावधीने अर्ज दाखल केला आहे. अर्जातील कारण खोटे आहे. सबब, अर्ज नामंजुर करावा अशी मागणी केली आहे.

३. प्रतिवादी क्र. ३, ६ व ७ यांना त्यांचे विरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द बातल करुन त्यांचे म्हणणे मांडायला संधी दिल्यास वादीचे व प्रतिवादींचे अपरिमीत असे नुकसान होणार नाही. सबब प्रतिवादी यांच्या बाबतच्या हरकती दाव्याचे वेळी ठरवण्यात येतील. सबब सद्य स्थितीला नैसर्गिक न्यायतत्वाचा विचार करुन प्रतिवादी क्र. ३, ६ व ७ यांना त्यांची बाजु मांडायला देणे गरजेचे आहे. मात्र, त्याचवेळेस झालेल्या विलंबाबाबत प्रतिवादींनी वादीला खर्चाची रक्कम देणे उचित रहाणार आहे. सबब मी खालील आदेश पारित करतो.

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. ३, ६ व ७ यांनी वादीला खर्चापोटी रक्कम रुपये २,०००/— द्यावेत.

३. प्रतिवादी क्र. ३, ६ व ७ यांचे विरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्दबातल करण्यात येतो. त्यांची कैफियत दाव्याचे कामी फैलावर घेण्यात येते.

सही/—

दिनांक— २८/८/२०१९

विनायक द. पाटील

दिवाणी न्यायाधीश क.स्तर वेंगुर्ला.